राज्यातील सर्व जिल्ह्यात जिल्हास्तरिय व्याघ्र
कक्ष समिती स्थापन करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन,**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : डब्ल्यूएलपी १०-२०००/प्र.क्र.१०/फ-१**
**मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.**
**दिनांक : १ ऑगस्ट, २००३**

वाचावे :- १) शासन निर्णय समक्रमांक दि. ७ नोव्हेंबर, २०००
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक म.रा. नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-२३ (६) /प्र.क्र.२९/१६१७/२००२-०३ दि.३०.९.२००२

**शासन निर्णय :-**

राज्यातील वन्यजीव संवर्धनासाठी, वाघ व इतर वन्यप्राण्यांच्या अवैध शिकारीस व त्याच्या अवयवांच्या चोरट्या व्यापारास आळा घालण्यासाठी उपरोक्त अ.क्र. १ येथील दि.७.११.२००० च्या शासन निर्णयान्वये राज्यात राज्यस्तरीय व महसूल विभागस्तरीय व्याघ्र कक्ष समिती स्थापन करण्यात आल्या आहेत. प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी उपरोक्त अ.क्र.२ येथील पत्राद्वारे राज्य स्तरीय समितीने दि.२८.६.२००२ च्या बैठकीत केलेल्या शिफारशीनुसार जिल्हास्तरिय समिती स्थापन करण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर केला. त्यानुषंगाने शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरीय व्याघ्र कक्ष समिती स्थापन करण्यात येत आहे. तसेच गडचिरोली जिल्ह्यातील विपुल वनसंपदा लक्षात घेऊन त्याठिकाणी गडचिरोली व आलापल्ली येथे दोन व्याघ्र कक्ष समित्या स्थापन करण्यात येत आहेत.

२. उपरोक्त जिल्हास्तरीय व्याघ्र कक्ष समितीची रचना पुढील प्रमाणे राहील

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जिल्हा पोलीस अधिक्षक | -- | अध्यक्ष |
| २. | संबंधित प्रादेशिक उप वनसंरक्षक | -- | सह अध्यक्ष |
| ३. | संबंधित विभागीय वन अधिकारी (दक्षता) | -- | सदस्य सचिव |
| ४. | संबंधित उप वनसंरक्षक (वन्यजीव) | -- | सदस्य |
| ५. | संबंधित पोलीस निरीक्षक (स्थानिक गुन्हे शाखा) | -- | सदस्य |
| ६. | संबंधित कार्यकारी अभियंता, म.रा.वि.मं. | -- | सदस्य |
| ७. | संबंधित मानद वन्यजीव रक्षक | -- | सदस्य |
| ८. | संबंधित पोलीस अधिक्षक (लोहमार्ग) | -- | स्थायी निमंत्रित |

३.   ज्या जिल्ह्यांमध्ये एकापेक्षा अधिक प्रादेशिक उप वनसंरक्षक आहेत अशा जिल्ह्यात ज्येष्ठतम उप वनसंरक्षक (प्रादेशिक) हे सह अध्यक्ष राहतील व इतर उपवनसंरक्षक (प्रादेशिक) समितीचे सदस्य राहतील.

४.   उपरोक्त जिल्हास्तरीय व्याघ्र कक्ष समितीची कर्तव्ये / जबाबदाऱ्या दि.७.११.२००० च्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आलेल्या महसूल विभागस्तरीय समितीप्रमाणे राहतील. मात्र प्रत्येक महिन्यात किमान एकदा बैठक आयोजित करणे बंधनकारक राहील.

५.   सदर शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या व गृह विभागाच्या सहमती निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( संजीव गौड )
विशेष कार्य अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,

मा. मुख्यमंत्र्याचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. उपमुख्यमंत्र्यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. गृह मंत्र्यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय
अपर मुख्य सचिव (गृह विभाग), मंत्रालय, मुंबई
प्रधान मुख्य वनसंरक्षक , महाराष्ट्र राज्य, नागपूर.
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
पोलीस महानिदेशक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
अतिरिक्त पोलीस महानिदेशक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
मुख्य वनसंरक्षक (सर्व)
पोलीस आयुक्त मुंबई / ठाणे/पुणे/नागपूर/नवी मुंबई/नाशिक/औरंगाबाद/सोलापूर/अमरावती
विशेष पोलीस महानिरिक्षक ठाणे/नागपूर/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नांदेड/कोल्हापूर
वनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व
वनसंरक्षक (वन्यजीव)सर्व
पोलीस अधिक्षक (सर्व)
उपवनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व
उपवनसंरक्षक (वन्यजीव) सर्व

C:\WINDOWS\Desktop\2003\July\70